**INTERMEDIATE**
**PART - II**

Time : 3 Hours | **Marathi Model Paper - I** **(Second Langauge)** | Max. Marks : 100

---

## विभाग - अ

**प्रश्न 1. खालीलपैकी कोणत्याही एका कवितेचा सारांश लिहा .** **1 x 6 = 6**

1. प्राणसई
2. शब्द
3. दवांत आलिस भल्या पहाटीं

**प्रश्न 2. अ) खालीलपैकी 'दोन' पद्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **2 x 5 = 10**

1. विहिरीच्या तळीं खोल, दिसूं लागलें ग भिंग
मन लागेना घरांत : कधी येशील तू सांग ?

2. दवांत आलीस भल्या पहाटीं, शुक्राच्या तोऱ्यांत एकदा;
जवळुनि गेलिस पेरित अपुल्या, तरल पावलांमधली शोभा.

3. आकान्ताने हाका घातल्या माझ्या
तेव्हा तेव्हा शब्दच धावून आले,
माझ्या निरुत्तर निखाऱ्यांना
माउलीने घ्यावे तसे पोटाशी घेतले.

4. कधी जखम व्हायची, चिघळायची, रक्त वहायचं
पण नादाच्या भूलभुलैय्यातुन बाहेर न पडता
पैंजणाखाली फडके बांधून
जखमांना ऊब देऊन ती राज करायची !

5. अगं पायाखालचे काटे मोडण्यासारखे
पायच होऊ देत आता... घट्ट, मजबूत, पोलादी
पुढल्या का होईना शतकाआधी !

**आ) खालीलपैकी कोणत्याही दोन उताऱ्यांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** **2 x 5 = 10**

1. 'धर्मापेक्षा माणूस मोठा आहे आणि माणसापेक्षा माणुसकी फार-फार मोठी आहे !'
2. 'माझी पुस्तकं हीच माझी अपत्यं'
3. 'असली कल्पनेची भरारी कोणत्या जुन्या संगीतात आढळून येईल ?'
4. 'तर 'मैत्रीणींना वहिनींचा सल्ला' हा आजचा शेवटचा कार्यक्रम.'
5. 'तू मात्र आज लोकांना कडू क्विनाईनचा डोस देणाचं धाडस केलंस'

**प्रश्न 3. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **2 x 4 = 8**

1. कवयित्रीने उन्हाळ्याच्या तीव्रतेचे वर्णन करताना योजलेली प्रतीके स्पष्ट करा.
2. ‘डोळ्यांमधल्या डाळिबांचा, सांग धरावा कैसा पारा’ या काव्यपंक्तीचा तुम्हाला समजलेला अर्थ स्पष्ट करा.
3. ‘शब्द म्हणजे कवीचे सामर्थ्य’, हे विधान स्पष्ट करा.
4. ‘पैंजण’ या कवितेचे रसग्रहण करा.
5. ‘कवयित्री आणि प्राणसई यांच्यातील नाते जिव्हाळ्याचे आहे’, स्पष्ट करा.

**प्रश्न 4. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे लिहा.** **2 x 4 = 8**

1. मामूच्या संवेदनशीलतेची दोन उदाहरणे तुमच्या शब्दांत लिहा.
2. पुस्तकांविषयीचा लेखकाचा दृष्टिकोन तुमच्या शब्दांत लिहा.
3. ‘बहिणाबाईचे साहित्य जुन्यात चमकणारे व नव्यात झळकणारे आहे’, हे लेखकाचे विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.
4. ‘पैसा हे साधन आहे, साध्य नव्हे’, हे विधान पाठाद्वारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.
5. वहिनींचा ‘सुसाट’ सल्ला ही कथा तुम्हाला का आवडते ते लिहा.

**प्रश्न 5. अ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.** **4 x 1 = 4**

1. कवयित्रीने कोणाला विनंती केली ?
2. डोळ्यांना कवीने दिलेली उपमा कोणती ?
3. ‘‘शब्दांचा उजेड’ म्हणजे काय ?
4. आजीने पायात काय घातले होते ?

**आ) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.** **4 x 1 = 4**

1. ‘नेपोलियन’ कोण होता ?
2. संसार रथाची दोन चाके कोणती ?
3. मुर्खाच्या हाती काय देऊ नये ?
4. ‘चैतन्याचे छोटे कोंब’ कोणाला म्हटंले आहे ?

## विभाग - 'ब'

**प्रश्न 6. खालील प्रश्नांचे उत्तर लिहा .** **1 x 5 =5**

व्यावसायिक नाटकाचे स्वरूप व वैशिष्ट्ये तुमच्या शब्दात स्पष्ट करा.

**प्रश्न 7. खालीलपैकी कोणताही एक प्रश्न सोडवा.** **1 x 5 =5**

1. मोनिका व कृष्णराव यांच्यातील संवादाची तुम्हांला समजलेली वैशिष्ट्ये लिहा.
2. रंगसूचना कथानकातील दुवे कसे जोडतात ते स्पष्ट करा.
3. कंसातील मजकूर नाट्यउतारा समजण्यासाठी उपयुक्त ठरतात; तुमचे मत लिहा.

**प्रश्न 8. खालीलपैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा.** **2 x 5 = 10**

1. 'वसुंधरा दिनानिमित्त' होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेची कार्यक्रम पत्रिका तयार करा.
2. मुद्रितशोधनासाठी लागणारी कौशल्ये सविस्तर विशद करा.
3. अनुवाद करताना पाळायची पथ्ये तुमच्या शब्दांत लिहा.
4. बोलीभाषा आणि प्रमाणभाषा याबाबतची अनुवादकाची भूमिका स्पष्ट करा.
5. अनुवादाची कार्यक्षेत्रे स्पष्ट करा.

**प्रश्न 9.** 'व्यंजना' शक्तीचे उदाहरणासहित वैशिष्ट्ये सांगा. **1 x 4 = 4**

**प्रश्न10. कंसात दिलेल्या सूचनेनुसार खालील वाक्य बदला.** **3 x 1 = 3**

1 राजू वारंवार कॉफी पितो. त्याच्या आईला ते आवडत नाही. (केवल वाक्य करा)

2 मुले खो-खो खेळत होती. (पूर्ण भूतकाळ करा)

3. रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावे (साधा वर्तमानकाळ करा.)

**प्रश्न11. खालीलपैकी कोणतेही पाच विरुद्धार्थी शब्द लिहा.** **5 x 1 = 5**

| | | |
|---|---|---|
| 1. अमृत × ……… | 2. अनाथ × ……… | 3. अनुज × ……… |
| 4. अपेक्षित × ……… | 5. अतिवृष्टी × ……… | 6. अब्रू × ……… |
| 7. अधोगती × ……… | 8. अमावस्या × ……… | 9. अवजड × ……… |
| 10. अवघड × ……… | | |

**प्रश्न12. खालीलपैकी कोणत्याही 'पाच' शब्दांचे वचन बदला.** **5 x 1 = 5**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. लेखणी | 2. केळे | 3.. बहीण | 4. भाकरी |
| 5. देश | 6. साल | 7. शाळा | 8. खारीक |
| 9. मशाली | 10. लिंबे | | |

**प्रश्न13. खालीलपैकी कोणत्याही तीन म्हणींचे मराठीत भाषांतर करा.** **3 x 1 =3**

1. A bad workman always blames his tools.
2. No pains, no gains
3. A fig for the doctor when cured.
4. An empty vessel makes much noise.
5. As you sow, so you reap.
6. A drowning man will clutch at a straw.

**प्रश्न14. खालीलपैकी कोणत्याही 'पाच' शब्दांचे दोन समानार्थी शब्द लिहा.** **5 x 1 = 5**

| | |
|---|---|
| 1. आनंद – – | 2. काळोख – – |
| 3. दुष्ट – – | 4. तोंड – – |
| 5. देऊळ – – | 6. दानव – – |
| 7. आकाश – – | 8. अरण्य – – |
| 9. आई – – | 10. पिता – – |

**15. उपसर्ग आणि प्रत्यय लावून कोणतेही पाच शब्द तयार करा.** **5 x 1 = 5**

| | | | |
|---|---|---|---|
| 1. अर्थ | 2. कृपा | 3. धर्म | 4. बोध |
| 5. गुण | 6. नशीब | 7. जय | 8. इनाम |
| 9. मती | 10. हजर | | |